# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०२५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक १७ मार्च, २०२५ / फाल्गुन २६, १९४६ (शके)**

| | | |
|---|---|---|
| (१) | महसूल मंत्री | यांचे प्रभारी विभाग |
| (२) | वने मंत्री | |
| (३) | आदिवासी विकास मंत्री | |
| (४) | कृषी मंत्री | |
| (५) | सामाजिक न्याय मंत्री | |
| (६) | रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभूमी विकास मंत्री | |
| (७) | मदत व पुनर्वसन मंत्री | |
| (८) | मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २५**

---

### महाराष्ट्र-कर्नाटक सीमा भागातील विद्यार्थ्यांना तलाठी भरतीमध्ये संधी मिळणेबाबत

**(१) * २ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रक क्रमांक मकसी १००७/ प्र.क्र. ३६/का.३६, दिनांक १० जुलै, २००८ नुसार पदांच्या सेवा प्रवेश नियमांमध्ये महाराष्ट्रात १५ वर्षे वास्तव्याची अट विहित करण्यात आली असून या अटीची छाननी करताना महाराष्ट्र-कर्नाटक सीमा भागातील ८६५ गावांतील १५ वर्षांचे वास्तव्य विचारात घेण्यात यावे, असा उल्लेख असताना तलाठी गट “क” संवर्गाच्या जाहिरातीकरीता अर्ज दाखल करण्याच्या ऑनलाईन पोर्टलमध्ये सदर गावांचा समावेश नसल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मराठी भाषिक गावांतील तरुणांना तलाठी भरती प्रक्रियेत अर्ज दाखल करण्याकरीता तसेच ऑनलाईन पोर्टल प्रक्रियेत सदर गावांचा समावेश करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान अशी बाब निदर्शनास आली नाही.

तलाठी पदभरती परीक्षा २०२३ बाबत जाहिरात क्र.४५/२०२३, दिनांक २६/०६/२०२३ नुसार दिनांक २६/०६/२०२३ पासून उमेदवारांना ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याकरीता लिंक उपलब्ध करून देण्यात आली होती. अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक २५/०७/२०२३ हा निश्चित करण्यात आला होता. जाहिरात प्रसिद्धीपासून ते दिनांक २५/०७/२०२३ या कालावधीत महाराष्ट्र-कर्नाटक सीमा भागातील उमेदवारांना अर्ज करता येत नाही, अशा आशयाची कोणतीही तक्रार/ निवेदन शासनास प्राप्त झालेले नाही. महाराष्ट्र-कर्नाटक सीमा भागातील सुमारे ३९१ उमेदवारांनी तलाठी पदभरती परीक्षा, २०२३ करीता अर्ज भरला असल्याचे दिसून येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गोदावरी (ता.पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर) नदीपात्रातून अवैधरित्या वाळू उपसा होत असल्याबाबत

**(२)** * **६०१ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोदावरी (ता.पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर) नदीपात्रातून मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उपसा सुरू असून अनधिकृतपणे तीनशेहून अधिक विटभट्टी मालकांकडून मातीचा अवैध उपसा करण्यात येत असल्याची घटना दिनांक ८ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या परवानगीशिवाय होत असलेल्या वाळू व माती उपसामुळे पर्यावरणाचाही ऱ्हास होत आहे तसेच वाळू उपसा व वाहतुकीसाठी असलेल्या मार्गांवर चार पोलीस ठाणे असतानाही पोलिसांकडून अवैध वाहतुकीवर कोणतीही ठोस कारवाई करण्यात येत नसल्याने शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या महसूलाचेही नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील गोदावरी नदीपात्रातून अवैध वाळू उपसा करणाऱ्या व अनधिकृत विटभट्टींवर तसेच महसूलाचे नुकसान करणाऱ्या जबाबदार अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) अंशत: खरे आहे.

दिनांक १६/०१/२०२५ रोजी मौजे पाडळी, ता.पैठण येथील ग.नं. १४४ मधुन अवैधरित्या मुरूम उत्खनन व वाहतूक करताना आढळून आलेला ३ हायवा व १ जेसीबी यांच्यावर रुपये १३,५०,०००/- एवढ्या रकमेची दंडात्मक कारवाई करून वसूल करण्यात आले आहेत.

(२) अवैध वाहतूक प्रकरणामध्ये तहसिलदार, पैठण कार्यालयाकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीत १२५.३९ ब्रास रेतीसाठा जप्त करण्यात येवून लिलावाअंती रुपये ०१,५५,०००/- शासन जमा केले आहेत.

जिल्हाधिकारी, कार्यालय छत्रपती संभाजीनगर व पोलीस अधीक्षक यांनी संयुक्तपणे केलेल्या दौऱ्याच्या पाहणीत मौजे कासवान येथे अंदाजे ३५ ब्रास अवैध वाळू साठा जप्त केला आहे.

पैठण तालुक्यात २८ विटभट्टयाच्या ठिकाणी आढळून आलेल्या अवैध मातीच्या ढिगाऱ्याच्या अनुषंगाने संबंधित विटभट्टीधारकांना रितसर नोटीस बजाविण्यात येवून रुपये ०५,५२,०००/- एवढी दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आलेली आहे.

पैठण तालुक्यात चार पोलीस स्टेशन असून सन २०२४-२०२५ मध्ये अवैध उत्खनन व वाहतूकीच्या एकूण ०४ प्रकरणी कारवाया करण्यात आल्या असून, संबंधितावर गुन्हे दाखल करून वाहने जप्त करण्यात आली आहे.

महसूल व पोलीस यंत्रणेकडून वेळोवेळी कार्यवाही करण्यात आली असून पर्यावरणाचा ऱ्हास झाल्याची कोणतीही बाब निदर्शनास आली नाही.

(३) व (४) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत

**(३) * २०२ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सत्यजीत तांबे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, श्री.पंकज भुजबळ, श्री.अरुण लाड, श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०२४ मध्ये झालेल्या अवकाळी पाऊस, गारपीट आणि अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून विशेषत: जळगाव, धुळे, सांगली, अकोला, नाशिक, कोल्हापूर, नागपूर आणि इतर जिल्ह्यांमधील हजारो हेक्टरवरील फळे, भाज्या तसेच रब्बी व खरीप पिकांचे नुकसान झाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अकोला जिल्ह्यात माहे ऑक्टोबर, २०२४ मध्ये ४५ गावांतील १४,७०६ शेतकऱ्यांचे २२.७३ कोटींचे तर माहे जून-जूलै, २०२४ मध्ये १५२ गावांमधील ९,५८८ हेक्टरवरील पिकांचे तसेच माहे सप्टेंबर-ऑक्टोबर, २०२४ मध्ये ५७,७५८ हेक्टरवरील पिकांचे, कोल्हापूर जिल्ह्यातील १,६२,८०५ शेतकऱ्यांचे ४७,८९१ हेक्टरवरील पिकांचे १२२.४२ कोटींचे, सांगली जिल्ह्यातील कृष्णा आणि वारणा नदीकाठच्या १७,०३५ शेतकऱ्यांचे ६,००० हेक्टरवरील पिकांचे ११ कोटी ९२ लाख रुपयांचे तर नाशिक जिल्ह्यातील १०,१२९ हेक्टरवरील शेती बाधित होवून १८,९४५ शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे तसेच नरखेड (जि.नागपूर) तालुक्यात संत्रा आणि मोसंबी फळगळ झाली असून त्याकरीता २८.८२ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध असूनही वाटप करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उपरोक्त प्रकरणी झालेल्या नुकसानीचे पंचनामे पूर्ण करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मकरंद जाधव (पाटील) :** (१), (२) व (३) राज्यात अनेक जिल्ह्यामध्ये अतिवृष्टी, गारपीट व अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीबाबत ग्रामस्तरावर महसूल, ग्रामविकास विभाग व कृषी विभागाच्या सर्वेक्षण व संयुक्तिक वस्तुनिष्ठ पंचनामे नुसार सन २०२४ या कालावधीसाठी निधी मागणीचे प्रस्ताव शासनास सादर केल्यानुसार शासनाने सन २०२४ करीता राज्यासाठी खालीलप्रमाणे शासन निर्णयानुसार एकूण निधी मंजूर केला आहे.

| दिनांक | निधी (लक्ष) |
|---|---|
| ४/३/२०२४ | २४६७.३७ |
| २/८/२०२४ | ५९६२१.९५ |
| ५/९/२०२४ | ३०७२५.२९ |
| २०/९/२०२४ | ४४७४.२५ |
| २०/९/२०२४ | २३७२.९३ |
| २३/९/२०२४ | २३७०७.१३ |
| ३०/९/२०२४ | १३८५५.४८ |
| ४/१०/२०२४ | ९९७०४.३६ |
| १०/१२/२०२४ | २९२०५७.५० |
| २८/०२/२०२५ | ७३३४५.८४ |

तसेच त्यामध्ये जिल्हानिहाय खालीलप्रमाणे निधी मंजूर केला आहे.

(रुपये लक्ष)

| दिनांक | अकोला | कोल्हापूर | सांगली | नाशिक | नागपूर |
|---|---|---|---|---|---|
| ४/३/२०२४ | - | - | - | ४.७० | ६६४.१८ |
| २/८/२०२४ | ५४०६.२७ | - | - | ९९८.९६ | २८१६.४६ |
| ५/९/२०२४ | ५९.३२ | ७.२३ | १.४५ | - | २१०२.८४ |
| २०/९/२०२४ | - | - | १२५.२३ | - | - |
| २०/९/२०२४ | - | - | - | ०.९९ | - |
| २३/९/२०२४ | १२९०.१७ | - | १११३.२५ | - | १८३६.५६ |
| ३०/९/२०२४ | - | १२२४२.३७ | ०.०२ | ०.९५ | - |
| १०/१२/२०२४ | - | - | ३४८.२४ | २१.८२ | ६४६५.६० |
| २८/२/२०२५ | २२७३.८६ | - | ८०५.६५ | १९३०८.८१ | १००२.४५ |

तसेच, नागपूर (नरखेड) यांनी २८.८८ कोटी निधी मागणी केल्यानुसार शासनाने २८.८८ लक्ष निधी वितरीत केला आहे.

E-KYC झालेल्या शेतकऱ्यांना डी.बी.टी. प्रणालीद्वारे निधी वितरीत करण्यात येत आहे. काही ठिकाणी DBT प्रणालीवर माहिती क्षेत्रिय यंत्रणेमार्फत भरण्याची प्रक्रिया सुरु आहे. तसेच ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण न झाल्याने वितरण बाकी आहे. प्रलंबित ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी काही तालुकास्तरावर कॅम्पचे विशेष आयोजन करण्यात आलेले आहे.

काही शेतकऱ्यांचे बँक खाते आधारकार्ड संलग्न नसल्यामुळे, सामाईक खातेदारांचे अनुदान कोणाच्या खात्यावर जमा करावे याबाबतचे संमतीपत्र दिले नसल्याने, मयत खातेदारांची वारस नोंद झाली नसल्याने तसेच परगावाच्या खातेदारांचे बँक तपशील, आधारकार्ड, इ. माहिती उपलब्ध होत नसल्याने अनुदान वाटपास विलंब होत आहे.

तथापि, याबाबत वेळोवेळी आढावा घेऊन तात्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील ‘नीलकमल’ बोटीच्या अपघातात १५ जणांचा मृत्यू झाल्याबाबत

**(४) * ६१ श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील गेटवे ऑफ इंडिया येथून घारापुरी बेटावर क्षमतेपेक्षा अधिक पर्यटकांना घेऊन निघालेली ‘नीलकमल’ बोट व नौदलाची स्पीड बोट यांच्यात धडक होऊन झालेल्या अपघातात १५ पर्यटकांचा मृत्यू झाल्याची घटना दिनांक १८ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यादरम्यान घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू बोट दुर्घटनेतील मृत व्यक्तींच्या नातेवाईकांना नुकसान भरपाई देण्याच्या दृष्टीने तसेच भविष्यात अशा प्रकारच्या दुर्घटनांची पुनरावृत्ती टाळण्याच्यादृष्टीने शासनामार्फत कोणती कार्यवाही व उपाययोजना करण्यात आली आहे तसेच सदरहू बोट दुर्घटनेस जबाबदार असलेल्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नितेश राणे :** (१) होय.

नौदलाच्या स्पीड बोटीची जोरात धडक बसल्याने एम एल नीलकमल -१ या प्रवासी बोटीतील व नौदलाच्या स्पीड बोटीतील एकूण १५ व्यक्ती मृत व ०२ प्रवासी गंभीर जखमी झाले होते व ९८ प्रवासी यांना भारतीय तटरक्षक दल, जवाहरलाल नेहरु बंदर प्राधिकरण, मुंबई बंदर प्राधिकरण, सीआयएसएफ, भारतीय नौदल, पोलीस विभाग व इतर खाजगी बोटीने वाचविण्यात आले.

(२) दुर्घटना बाधित १० मृत व्यक्तीचे नातेवाईकांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून रक्कम रुपये ५ लाख इतकी आर्थिक मदत देण्यात आलेली आहे. उर्वरित व्यक्तींचे वारसा चौकशी अहवाल प्राप्त करण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच सदर मृत/जखमी व्यक्तीचे नातेवाईकांना पंतप्रधान राष्ट्रीय सहाय्यता निधीमधून आर्थिक मदत वितरीत करण्याची बाब कार्यवाहीखाली आहे.

कुलाबा पोलीस ठाणे यांनी या अपघाताचा FIR नोंदविला असून पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे. नौदल विभागाकडून अपघाताची स्वतंत्र चौकशी करण्यात येत आहे. तसेच सदर प्रकरणी मुख्य बंदर अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली चौकशी समिती स्थापन करण्यात आलेली आहे.

इनलॅन्ड व्हेसल ॲक्ट १९१७ आणि महाराष्ट्र मायनर पोर्टस (पॅसेंजर व्हेसल्स) रुल्स १९६३ मध्ये नमूद तरतुदीनुसार प्रवासी क्षमतेपेक्षा जास्त प्रवाशांची वाहतूक केल्यामुळे संबंधित मालक आणि चालक यांचेकडून नियमानुरुप दंड वसुली करण्यात आलेली आहे. तसेच एम एल नीलकमल-१ या बोटीचे नोंदणी प्रमाणपत्र, सर्व्हेप्रमाणपत्र, प्रवासी परवाना आणि बोटीवर कार्यरत मास्टरचे सक्षमता प्रमाणपत्र निलंबित करण्यात आलेले आहे.

महाराष्ट्र सागरी मंडळाच्या स्तरावरुन परिपत्रकाद्वारे प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून आवश्यक ती खबरदारी घेण्याच्या अनुषंगाने, सर्व बोट ऑपरेटर यांना सूचना दिलेल्या आहेत. गेटवे ऑफ इंडिया येथील प्रत्येक जेट्टीवर महाराष्ट्र सुरक्षा मंडळाचे जवान तैनात करण्यात आलेले असून त्यांच्याकडून प्रवासी बोटीत प्रवासी क्षमतेइतकी प्रवासी वाहतूक होत असल्याची खात्री केली जात आहे. तसेच बोटीत बसण्याआधी प्रत्येक प्रवाशाला लाईफ जॅकेट परिधान करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

महाराष्ट्र सागरी मंडळाच्या चौकशी अहवालाअंती अधिकची प्रवासी सुरक्षा उपाययोजनांची मार्गदर्शक तत्वे (SOP) बनविण्याची बाब कार्यवाहीखाली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकोला शहरातील महिलेच्या मृत्यूपश्चात बनावट मृत्यूपत्र बनवून गैरप्रकार केल्याबाबत

**(५) * ८३९ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.शिवाजीराव गर्जे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला शहरातील एका महिलेच्या मृत्यूपश्चात तिच्या नावे मृत्यूपत्र/इच्छापत्र बनवून कोट्यवधी रुपयांची संपत्ती सातबारा उताऱ्यावर स्वत:च्या नावे नोंदवून कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार करण्यात आला असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणात मागील दिनांकाचे नोटरी, बनावट साक्षीदार बनवून गैरप्रकार करण्यामध्ये १५ जणांचा समावेश असून त्यामध्ये एका माजी लोकप्रतिनिधींचा देखील सहभाग असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी जिल्हा प्रशासन (महसूल विभाग) अकोला यांचेकडे लेखी निवेदन करण्यात आले असून विभागीय आयुक्त, अमरावती आणि जमाबंदी आयुक्तांनी कार्यवाही केली आहे मात्र महसूल विभागातील अधिकारी/ कर्मचारी या प्रकरणांतील सहभागी लोकांना पाठीशी घालत असल्याचे तसेच सदर प्रकरणी पोलीस प्रशासनाने संबंधितांवर गुन्हे दाखल केले असूनही अद्यापि चार्जशीट दाखल न केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, अकोला यांच्याकडे ऑक्टोबर, २०२४ ते जानेवारी, २०२५ दरम्यान विषयांकित प्रकरणाबाबतचे कोणतेही निवेदन प्राप्त झाले नाही. तसेच विभागीय आयुक्त, अमरावती यांच्याकडेही माहे जानेवारी, २०२५ ते आजअखेर अशा प्रकारचे कोणतेही निवेदन प्राप्त झाले नाही. सदर विषयाच्या अनुषंगाने अकोला जिल्ह्यात माहे नोव्हेंबर, २०२४, डिसेंबर, २०२४ व जानेवारी, २०२५ दरम्यान कोणताही गुन्हा दाखल झाला नसल्याचा आवाज पोलीस अधीक्षक, अकोला यांनी शासनास सादर केला आहे.

तसेच माहे जानेवारी, २०२५ मध्ये सदर विषयाबाबतचे जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख (म.राज्य), पुणे यांना कोणतेही निवेदन/ फेरफार नोंदीचा अर्ज प्राप्त झालेले नाही. तथापि, विधानपरिषद तारांकित प्रश्नाच्या अनुषंगाने जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख कार्यालयाने कार्यालयीन नोंदीचा शोध घेतला असता, श्री.किरण श्रावण ठाकरे यांनी उपसंचालक, भूमी अभिलेख, अमरावती तसेच जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख (म.राज्य), पुणे यांच्याकडे कार्यालयाकडे दिनांक २८/११/२०२४ रोजी तक्रार अर्ज सादर केलेला होता.सदर अर्जात शहर अकोला येथील शिट नंबर ६४ प्लॉट नंबर १/१५ या मालमत्तेबाबत तत्कालीन धारक श्रीम. कांतादेवी राजकुमार गोयनका यांनी दिनांक ०७/२/२०२१ रोजी नोंदणी झालेल्या मृत्यूपत्रानुसार त्यांचेकडे काम करणारे श्री.किरण श्रावण ठाकरे यांना दिलेले असून त्याबाबत फेरफार क्रमांक ७४ दिनांक ३/४/२०२४ व फेरफार क्रमांक ८६ दिनांक १७/०७/२०२४ प्रलंबित असताना फेरफार क्रमांक ९१ मंजूर करण्यात आला याबाबत तक्रार करण्यात आलेली होती. याबाबत जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, अकोला कार्यालयामार्फत तक्रारकर्ते यांना उपाधीक्षक भुमि अभिलेख, अकोला कार्यालयाने मंजूर केलेले फेरफार ८९ व ९१ मान्य नसल्यास जिल्हाध्यक्ष, भूमी अभिलेख, अकोला कार्यालयास महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ आणि अपील दाखल करण्यास कळविण्यात आले आहे.

सदर बाबत तक्रारकर्ते श्री.किरण श्रावण ठाकरे यांनी जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, अकोला कार्यालय दिनांक ५/१२/२०१४ रोजी अपील दाखल केलेले असून त्यावर सुनावणी प्रक्रिया सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कृषी संशोधन केंद्र, बदनापुर (जि.जालना) या केंद्राच्या विकासकामांसाठी व संशोधनासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(६) * २३७ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी अंतर्गत सन १९५१ मध्ये कृषी संशोधन केंद्र, बदनापूर स्थापन करण्यात आले असून, सदर केंद्राअंतर्गत कडधान्य संशोधन गुणवत्ता व कडधान्य बिजोत्पादन प्रकल्प राबविले जातात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कडधान्य संशोधन गुणवत्ता केंद्राअंतर्गत विकसित केलेले तुरीचे बियाणे (वाण) बीडीएन-२, बीडीएन-२११ व गोदावरी हे देशभरात प्रसिध्द असून, कडधान्य बिजोत्पादन प्रकल्पाअंतर्गत मुग, तुर, उडीद इत्यादीच्या विकसित बियाणांना (वाण) राज्यभरात मोठ्या प्रमाणावर मागणी असूनही सन १९५१ पासून संशोधन केंद्र व बिजोत्पादन प्रकल्पाच्या विकासकामासाठी व संशोधनासाठी शासनाने निधी उपलब्ध करुन दिला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कृषी संशोधन केंद्राच्या बिजोत्पादन प्रकल्पासाठी रुपये २८५ लक्ष व रुपये १,४३१ लक्ष इतका निधी संशोधन कार्यासाठी मिळावा याकरीता महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे (MCAER) या संस्थेने शासनाकडे सन २०२४ मध्ये वा त्यादरम्यान प्रस्ताव सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने कृषी संशोधन केंद्र, बदनापूर येथील संशोधन कार्यासाठी निधी मिळण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**अ‍ॅड. माणिकराव कोकाटे :** (१) होय.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी अंतर्गत कृषी संशोधन केंद्र, बदनापूर, जि.जालना या केंद्राची स्थापना सन १९५१ मध्ये करण्यात आलेली आहे. सदर केंद्राअंतर्गत तूर, मूग, उडीद, आणि हरभरा या पीकांवर संशोधन केले जात आहे.
(२) हे खरे नाही.

सन १९५१ मध्ये स्थापन करण्यात आलेल्या कृषी संशोधन केंद्र, बदनापूर या केंद्राच्या प्रशासकीय इमारती, प्रयोगशाळा आणि कर्मचारी निवासस्थाने इत्यादीचे बांधकामाकरीता शासनाने निधी उपलब्ध करून दिलेला आहे. तसेच, सदर संशोधन केंद्राकरीता विद्यापीठाच्या आकस्मिकता निधीमधून वेतन व वेतनेतर खर्चाकरीता तसेच, संशोधन कार्याकरीता दरवर्षी निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.
(३) हे अंशत: खरे आहे.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी अंतर्गत कृषी संशोधन केंद्र, बदनापूर येथील कडधान्य बिजोत्पादन प्रक्षेत्राचे बळकटीकरण करणेबाबतचा रुपये २८५.७२ लाख रकमेचा प्रस्ताव महाराष्ट्र कृषी शिक्षण संशोधन परिषदेने शासनास सादर केलेला आहे.

तथापि, कडधान्य संशोधन गुणवत्ता केंद्राचा रुपये १४३१.०० लाख रकमेचा प्रस्ताव महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेमार्फत शासनास प्राप्त झालेला नाही.
(४) महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांनी सादर केलेला कृषी संशोधन केंद्र, बदनापूर येथील कडधान्य बिजोत्पादन प्रक्षेत्राच्या बळकटीकरणाचा रुपये २८५.७२ लाख रकमेचा प्रस्ताव तपासण्यात येईल. तसेच, यासंदर्भात निधीची उपलब्धता विचारात घेवून योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खटाव (जि.सातारा) तालुक्यात अवैधरित्या वाळू उत्खनन होत असल्याबाबत

**(७) * ९७७ श्री.शशिकांत शिंदे, श्री.एकनाथराव खडसे, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खटाव (जि.सातारा) तालुक्यात अवैधरित्या वाळू उत्खनन होत असल्याने शासनाचा मोठ्या प्रमाणात महसूल बुडत असून अवैधरित्या वाळू उत्खनन हे स्थानिक तलाठी, प्रांत, तहसिलदार व स्थानिक पोलीस यांच्या संगनमताने होत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अवैध वाळू उत्खननासंदर्भात लोकप्रतिनिधींनी वारंवार तक्रारी करुनही संबंधिताविरुध्द कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खटाव तालुक्यातील अवैधरित्या वाळू उत्खनन प्रकरणी शासनाने संबंधित अधिकाऱ्यांवर व वाळू तस्करांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) खटाव (जि.सातारा) तालुक्यात स्थानिक तलाठी, प्रांत, तहसिलदार व स्थानिक पोलीस यांच्या संगनमताने अवैध वाळू उत्खनन होत असल्याची बाब खरी नाही.

(२) व (३) सन्मानिय लोकप्रतिनिधीनी अवैध वाळू उत्खननाबाबत भ्रमणध्वनीद्वारे केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सदर ठिकाणाची स्थळपाहणी व पंचनामे करुन ५ व्यक्तींना तहसिलदार, खटाव यांनी नोटीस बजावल्या होत्या. त्यानुसार संबंधितांना त्यांचे म्हणणे सादर करणेची संधी देऊन त्यांच्याविरुध्द दंडात्मक कारवाई केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्ह्यातील रोजगार हमी योजनेंतर्गत काम करणाऱ्या मजुरांची थकीत देयके अदा करण्याबाबत

**(८) * ५७० श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील आदिवासी दुर्गम गाव पाड्यांमध्ये सुरू करण्यात आलेल्या रोजगार हमी योजनेंतर्गत काम करणाऱ्या शेकडो मजुरांना गेल्या चार महिन्यांपासून मजूरी मिळत नसल्याची बाब माहे डिसेंबर, २०२४ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मजुरांची थकीत मजूरी देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच मजूरी थकीत ठेवणाऱ्या संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**श्री.भरत गोगावले :** (१) हे अंशत: खरे आहे

(२) केंद्र शासनाकडून निधी अप्राप्त असल्याने निधीत अकुशल मजुरीचा निधी वितरीत करता आला नाही. मा.मुख्यमंत्री महोदय महाराष्ट्र राज्य, मा.मंत्री (रोहयो), मा.सचिव (रोहयो) व मा.आयुक्त, नरेगा, नागपूर यांच्यामार्फत पाठपुरावा करण्यात येत आहे.

दिनांक ०८ जानेवारी, २०२५ रोजी पर्यंतची रक्कम रुपये २१६.६१ कोटी प्रलंबित मजूरी अदा करण्यात आलेली आहे.

(३) केंद्र शासनाचा निधी अप्राप्त असल्याने विलंब झाला आहे.

-----------------

## राज्यातील शेतकऱ्यांच्या शासकीय थकबाकीपोटी शासन जमा झालेल्या जमिनी शेतकऱ्यांना परत देण्याबाबत

**(९) * ९९६ श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांच्या शासकीय थकबाकीपोटी लिलाव होऊन शासन जमा झालेल्या सुमारे ४ हजार ८४९ एकर आकारी पड जमिनी शेतकऱ्यांना परत देण्याचा निर्णय शासनाने माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खातेदारांना प्रचलित बाजार मुल्याच्या २५% रक्कम भरून सदर जमिनी परत घेता येणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निर्णयाची अंमलबजावणी तातडीने करण्याबाबत तसेच मूळ खातेदारांना अशा आकारी पड जमिनी परत करण्याबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) होय, अंशत: हे खरे आहे.

(३) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम २२० मध्ये आकारी पड जमिनींच्या संदर्भात मा.मंत्रिमंडळ बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार सुधारणा प्रस्तावित केल्या आहेत. त्यानुषंगाने, सदर विधेयक विधिमंडळाच्या चालू अधिवेशनात सादर करण्याची कार्यवाही विधी व न्याय विभागामार्फत करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोंदिया जिल्ह्यातील केंद्रीय विद्यालयाला एकाच ठिकाणी दहा एकर जागा मिळण्याबाबत

**(१०) * ३९४ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्ह्याकरीता सन २०१६ मध्ये केंद्रीय विद्यालय मंजूर करण्यात आले असून या विद्यालयासाठी गोंदिया शहराजवळ दहा एकर जागेची आवश्यकता असून मागील आठ वर्षांसून संबंधित प्रशासनाने सदर विद्यालयासाठी जागा उपलब्ध करुन दिली नसल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर केंद्रीय विद्यालयाला एकाच ठिकाणी दहा एकर जागेची आवश्यकता असताना जिल्हा प्रशासनाने दोन ठिकाणी जागा देण्याचे ठरविल्याने केंद्रीय विद्यालय प्रशासन मंडळाने सदर प्रस्ताव नाकारीत पूर्वीप्रमाणेच एकत्रित जागेची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, केंद्रीय विद्यालयाकरीता एकाच ठिकाणी १० एकर जागा उपलब्ध करुन देण्याकरीता शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२) व (३) हे खरे नाही. तथापि, सन २०२३ मध्ये प्राचार्य केंद्रीय विद्यालय, भंडारा यांच्याकडून कमीत कमी ५ एकर भूखंड किंवा अस्थाई स्वरुपात इमारतीची आवश्यकता असल्याचे पत्र प्राप्त झाले होते. त्यानुसार क्षेत्रिय अधिकारी यांनी तपासणी/चौकशी केली असता, गोंदिया शहरालगतच्या गावांमध्ये ५ एकर जागा शासकीय जागा उपलब्ध नसल्याचा अहवाल प्राप्त झाला आहे.
(४) प्रस्तावाच्या अनुषंगाने कार्यवाही झालेली असून कोणताही विलंब झालेला नाही.

-----------------

## खडकवासला (जि.पुणे) येथील शासकीय वसतिगृहातील विद्यार्थिनींना दूषित पाण्यामुळे त्रास झाल्याबाबत

**(११)** * **१०८४ श्री.योगेश टिळेकर :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समाजकल्याण आयुक्तालयाच्या अखत्यारित असलेल्या खडकवासला (जि.पुणे) येथील शासकीय वसतिगृहातील दूषित पिण्याच्या पाण्यामुळे १० ते १२ मुलींना अचानक पोटदुखी, मळमळ, उलट्या आणि जुलाबाचा त्रास होऊन अंगावर खाज व पुरळ आल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वसतिगृहातील विद्यार्थिनींनी वसतिगृह प्रशासनाकडे तक्रार करूनही प्रशासनाकडून याबाबत कोणतीच खबरदारी घेण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने उपरोक्त प्रकरणी संबंधित दोषी अधिकारी / कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली तसेच वसतिगृहातील विद्यार्थिनींना शुध्द पाणीपुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट :** (१) होय.

दिनांक १३/०१/२०२५ रोजी सदर वसतिगृहातील प्रवेशित विद्यार्थीनींनी पोटदुखी, मळमळ, उलट्या आणि जुलाबाचा त्रास होत असल्याची तक्रार वसतिगृह प्रशासनाकडे दिलेली आहे.

(२) नाही.

सदर वसतिगृहातील त्रास होत असलेल्या सर्व विद्यार्थीनींना नजीकच्या रूग्णालयात दाखल करून त्यांच्यावर उपचार करण्यात आले आहेत.

(३) सदर वसतिगृहातील जलशुध्दीकरण यंत्राची तपासणी केली असता, जलशुध्दीकरण यंत्रामध्ये कोणताही बिघाड आढळून आला नाही. तसेच वसतिगृहातील विद्यार्थीनींना स्वच्छ व शुध्द पाणीपुरवठा करण्याची कार्यवाही वसतिगृह स्तरावर करण्यात येत आहे. सबब, संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय वसतिगृहातील गैरसोयीबाबत

**(१२)** * **१०८८ श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समाजकल्याण विभागातर्फे किलेअर्क (जि.छत्रपती संभाजीनगर) परिसरात सन २००८ मध्ये सुरु करण्यात आलेल्या १००० विद्यार्थ्यांची क्षमता असलेल्या वसतिगृहात १ ते ३ युनिट तसेच संत तुकाराम मुलांचे वसतिगृह आणि मिलिंद मुलांचे वसतिगृह ही दोन्ही वसतिगृहे शासकीय वसतिगृहे आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वसतिगृहांच्या उभारणीपासून त्यांची देखभाल-दुरुस्ती करण्यात न आल्याने गळके छत, तुटलेले दरवाजे व खिडक्या, अपुरा पाणीपुरवठा, साहित्य व सोयीसुविधांचा अभाव, निकृष्ट जेवण, सोलारची दुरवस्था इ. समस्या असल्याचे मा.सामाजिक न्याय मंत्री यांना दिनांक ७ जानेवारी, २०२५ रोजी दिलेल्या भेटीदरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त वसतिगृहातील गैरव्यवस्थेस तसेच देखभाल-दुरुस्तीस जबाबदार असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच वसतिगृहातील गैरसोयी व असुविधा दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट :** (१) होय, हे खरे आहे.

(२) मा.मंत्री, सामाजिक न्याय यांनी दिनांक २४/१२/२०२४ रोजी १००० मुलांचे शासकीय वसतिगृह, किलेअर्क, छत्रपती संभाजीनगर या वसतिगृहास भेट दिली असता सदर शासकीय वसतिगृहातील काही सोयीसुविधांमध्ये त्रृटी असल्याचे आढळून आले आहे.

(३) होय, याबाबत आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यास्तरावरुन चौकशी करण्यात आली आहे. सदर चौकशीच्या अनुषंगाने आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या दिनांक १७/०१/२०२५ च्या आदेशानुसार संबंधित वसतिगृहाचे गृहप्रमुख/गृहपाल यांच्यावर निलंबनाची कार्यवाही करण्यात आली आहे. तसेच, साफसफाईच्या कामासाठी नियुक्ती केलेल्या बिव्हिजी या कंपनीला रुपये १,५०,०००/- इतका दंड करण्यात आला आहे. तसेच, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर १००० मुलांचे शासकीय वसतिगृह, किलेअर्क, छत्रपती संभाजीनगर येथील इमारत दुरुस्ती कामाच्या सुधारीत अंदाजपत्रकास शासन ज्ञापन दिनांक ०८/०१/२०२५ अन्वये रुपये ४,९९,९९,८४८/- इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून पुढील कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## स्व.गोपीनाथ मुंडे अपघात सुरक्षा सानुग्रह योजनेंतर्गत अर्ज केलेल्या शेतकऱ्यांच्या वारसदारांना अनुदान देण्याबाबत

**(१३) * १२४२ श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विशेषत: कोल्हापूर जिल्ह्यात अपघातात मृत्यूमुखी पडलेल्या ३७५ शेतकऱ्यांच्या वारसदारांनी स्व.गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह योजनेंतर्गत कृषी विभागाकडे प्रस्ताव दाखल करूनही अद्याप सानुग्रह अनुदान मिळाले नसल्याची बाब माहे जानेवारी,२०२५ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यभरातील शेतकऱ्यांच्या वारसदारांनी दाखल केलेले सर्व प्रस्ताव अपात्र न दाखविता निकाली काढून अनुदान देण्याच्यादृष्टीने शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१) अंशत: खरे आहे.

कोल्हापूर जिल्ह्यात "गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह योजना" या योजनेंतर्गत माहे जानेवारी, २०२५ अखेरपर्यंत ४२४ प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. त्यापैकी २६५ प्रस्ताव मंजूर करण्यात आले असून ३९ प्रस्ताव नामंजूर करण्यात आले आहेत. तपासणी सूचीमधील आवश्यक कागदपत्राच्या त्रुटीपूर्ततेअभावी १०४ प्रस्ताव प्रलंबित आहेत. तसेच १६ प्रस्ताव तालुका स्तरावरील छाननी समितीकडे प्रलंबित आहेत.
(२) गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह योजनेंतर्गत मंजूर केलेल्या एकूण २६५ प्रस्तावांपैकी ६५ लाभार्थ्यांना रक्कम रुपये १.२८ कोटी इतके आर्थिक सहाय्य वितरीत करण्यात आले आहे. ८१ लाभार्थ्यांना रुपये १.५६ कोटी इतके आर्थिक सहाय्य अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच, उर्वरीत लाभार्थ्यांकरीता आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

"गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह योजना" या योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने प्राप्त प्रस्तावांची, योजनेच्या अटी व शर्तीशी अधीन राहून छाननी करण्यात येते. त्यानुसार, पात्र होणाऱ्या प्रस्तावांना अनुदान वितरणाची कार्यवाही करण्यात येते. तसेच, कागदपत्रांअभावी प्रलंबित असलेल्या प्रस्तावांची पूर्तता करुन घेऊन उक्त प्रस्ताव पात्र ठरल्यास आर्थिक सहाय्य देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्ह्यातील रोजगार हमी योजनेची कामे सुरु करणेबाबत

**(१४) * १३९५ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, अॅड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार, मोखाडा, वाडा, तलासरी, विक्रमगड तालुक्यात (जि.पालघर) रोजगार हमी योजनेची कोणतीही कामे सुरु नसल्याने ऐन दिवाळीत आदिवासी नागरिकांना शहरी भागात रोजगार मिळविण्यासाठी स्थलांतर करावे लागत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त तालुक्यातील आदिवासी नागरिकांना रोजगारासाठी शहरी भागात स्थलांतरीत व्हावे लागू नये याकरीता तालुक्यातच रोजगार तसेच मूलभूत सुविधांची कामे उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.भरत गोगावले :** (१) हे खरे नाही.

(२) पालघर जिल्ह्यामध्ये २०५१७ कामाचा शेल्फ असून ९७१८११२ मनुष्यदिन निर्मिती शक्य असून तालुक्यातील आदिवासी मजुरांना रोजगारासाठी स्थलांतरण करू नये याकरीता तालुक्यातच रोजगार उपलब्ध करून दिला जातो.

(३) विलंब झालेला नाही.

-----------------

## गडचिरोली जिल्ह्यातील मजूरांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गतच्या मोबदल्याची थकित रक्कम अदा करण्याबाबत

**(१५) * १७२९ श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यात ग्रामीण भागातील मजुरांचे स्थलांतरण थांबवून रोजगार देण्याबरोबर कुटुंबाची आर्थिक परिस्थिती सुधारावी या उद्देशाने कार्यान्वित केलेल्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत मजुरांना मोबदला मिळत नसल्याचे तसेच प्रत्येक तालुक्यात ४३ हजार नोंदणीकृत मजुरांची जवळपास ८ कोटी रुपयांची देयके प्रलंबित असल्याचे माहे डिसेंबर,२०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कुशल कामे व अकुशल कामांचे अनुक्रमे ४० व ६० टक्के वर्गीकरण करण्यात आलेले असून १५ दिवसांच्या आत पात्र लाभार्थ्यांच्या मजुरीची रक्कम खात्यात जमा करण्यात न आल्यामुळे मजुर व त्यांच्या कुटुंबियावर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गडचिरोली जिल्ह्यातील मजुरांचा मोबदला व देयकांची रक्कम थकित ठेवणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली व जिल्ह्यातील ग्रामीण आर्थिकदृष्ट्या दुर्बल मजुरांना विलंब शुल्कासह थकित रक्कम अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.भरत गोगावले :** (१) आर्थिक वर्ष सन २०२४-२५ मध्ये गडचिरोली जिल्ह्यातील एकूण १२ तालुक्यांमध्ये २२६७७३ कुटुंबांतील ५७७६४४ मजूर आहेत. त्यातील १९६६७३ मजुरांनी काम करून ५०५८८१७ मनुष्यदिवस रोजगार निर्मिती केलेली आहे. दिनांक १ डिसेंबर, २०२४ ते ३१ डिसेंबर, २०२४ या कालावधीत मजुरीपोटी प्रलंबित रक्कम दिनांक ८ जानेवारी, २०२५ ते १७ जानेवारी, २०२५ दरम्यान वितरीत करण्यात आली आहे. उर्वरीत निधीसाठी केंद्रशासनाकडे पाठपुरावा सुरू आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोऱ्हा (जि.पालघर) येथील आदिवासी विकास महामंडळाच्या गोडाऊनमधील हजारो क्विंटल भाताचे नुकसान झाल्याबाबत

**(१६) * १८१६ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोऱ्हा (जि.पालघर) येथील आदिवासी विकास महामंडळाच्या गोडाऊनमधील साडेचार हजार क्विंटल भाताचे नुकसान उंदीर आणि घुशींनी केल्याचे दिनांक १६ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि गोऱ्हा (जि.पालघर) येथील आदिवासी विकास महामंडळाच्या गोडाऊनमधील धान्याच्या होणाऱ्या नासाडीकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.डॉ. अशोक उईके :** (१) हे खरे नाही. तथापि, सदर आशयाचे वृत्त दिनांक १५/०१/२०२५ रोजीच्या वर्तमानपत्रात प्रसिध्द झाले होते.
(२) खरेदी केंद्र, गोऱ्हा, जि.पालघर येथील गोदामात एकूण ६०७६.८० क्विंटल धान खरेदी करण्यात आले होते. सदर धान भरडाईकरीता उचल करतेवेळी काही प्रमाणात धान गोदामात खाली पडला होता. परंतु

सदरचा पडलेला धान हा इतर गोणींत साठवणूक केलेला असून आज अखेर सदर गोदामांतून संपूर्ण धानाची भरडाई करीता १०० टक्के धान जावक झालेला आहे. त्यामुळे धानाचे कोणतेही नुकसान झााल्याचे दिसून येत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य शासनाच्या सेवेतील बोगस आदिवासी प्रमाणपत्र सादर केलेल्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(१७) * १८३२ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या सेवेत सन २०२१ ते २०२३ या कालावधीत १७७९ कर्मचाऱ्यांनी बनावट आदिवासी जात प्रमाणपत्रे सादर करून नोकरी मिळविल्याची तसेच वैद्यकीय आणि अभियांत्रिकी शिक्षणात राखीव असलेल्या जागांमध्येही ३३०७ उमेदवारांनी बनावट आदिवासी प्रमाणपत्रे सादर करून प्रवेश मिळविला असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगाने यासंदर्भातील अहवाल राज्य शासनाला सादर करून बनावट आदिवासी प्रमाणपत्र सादर करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याची सूचना केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने बनावट प्रमाणपत्र सादर करणाऱ्या कर्मचारी व विद्यार्थी यांच्यावर कोणती कारवाई केली तसेच उपरोक्त बनावट प्रमाणपत्र सादर केलेल्या कर्मचाऱ्यांची रिक्त होणारी पदे पुन्हा भरण्याबाबत अथवा गुणवत्ता यादीतील इतर उमेदवारांना नियुक्ती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.डॉ. अशोक उईके :** (१) होय.

(२) राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगाच्या दिनांक ०९/०१/२०२५ रोजी झालेल्या राज्यस्तरीय आढावा बैठकीच्या वेळी, अनुसूचित जमातीचे खोटे प्रमाणपत्र देणाऱ्या अधिकाऱ्यांवर सक्त कारवाई करण्याबाबतचे निर्देश राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगाने राज्य शासनाला दिले आहेत.

(३) अनुसूचित जमातीचे बनावट प्रमाणपत्र सादर केलेल्या शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आले आहे. तसेच अनुसूचित जमातीची रिक्त पदे भरण्याबाबत सामान्य प्रशासन विभागामार्फत सर्व विभागांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

सन २०१८ नंतर अनुसूचित जमातीचे वैधता प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय विद्यार्थ्यांना व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश देण्यात येत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील वनक्षेत्रात घट झाल्याबाबत

**(१८) * २१३ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.हेमंत पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पश्चिम घाटातील वन आच्छादनात १,८००.७५ चौरस किलोमीटरची घट झाली असून राज्यातील वनक्षेत्र कमी होवून केवळ १६.५३ टक्के शिल्लक राहिले असल्याचे तसेच मुंबईसह १८ जिल्ह्यातील वनांचे क्षेत्र कमी झाल्याचे भारतीय वन सर्वेक्षण अहवालातून माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वनक्षेत्रात झालेली घट व गत १० वर्षांत राज्यातील वनक्षेत्र फक्त दीड टक्क्यांनी वाढले असल्याने राज्यातील वन क्षेत्र वाढविणे, वनांची जोपासना, वन क्षेत्राचे संवर्धन व संरक्षण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक :** (१) हे खरे नाही.

राज्यातील १२ जिल्ह्यांचा समावेश पश्चिम घाटामध्ये होतो. भारत वन स्थिती अहवाल (ISFR)-२०२३ नुसार पश्चिम घाटातील जिल्ह्यांच्या एकंदरीत वनाच्छादनात (Forest Cover) सन २०२१ च्या तुलनेत १०६.९४ चौ.कि.मी. ने वाढ झाली आहे.

वार्षिक प्रशासन अहवाल-२०२३ नुसार वैधानिक दर्जाप्रमाणे राज्याचे अभिलिखीत एकूण वनक्षेत्र (Forest Area) ६१९९२.७६ चौ.कि.मी. (२०.१५ टक्के) असून ते २०१३ च्या तुलनेत ४१३.५६ चौ.कि.मी. ने वाढले आहे. भारत वन स्थिती अहवाल (ISFR)-२०२३ नुसार राज्याचे वनाच्छादन १६.५३ टक्के असून त्यामध्ये सन २०२१ च्या तुलनेत किंचीत वाढ झाली आहे.

भारत वन स्थिती अहवाल (ISFR)-२०२३ नुसार मुंबईसह १८ जिल्ह्यांचे वनक्षेत्र (Forest Area) कमी झालेले नसून सन २०२३ च्या अहवालानुसार सन २०२१ च्या तुलनेत राज्यातील मुंबईसह २५ जिल्ह्यांतील वनाच्छादन (Forest Cover) कमी झाल्याचे निदर्शनास आले आहे. तथापि, राज्यातील एकूण वनाच्छादनात किंचीत वाढ झाली आहे.

(२) मागील १० वर्षात (२०१३ ते २०२३) वनक्षेत्रात (Forest Area) ४१३.५६ चौ.कि.मी., वनाच्छादनात (Forest Cover) २२७ चौ.कि.मी. (२२,७०० हे.) व वृक्षाच्छादनात (Tree Cover) ५३८३ चौ.कि.मी. (५,३८,३०० हे.) ने वाढ झाली आहे. सदरहू वाढ महाराष्ट्र वनविभागाने राबविलेल्या विविध योजना जसे वनांचे प्रभावी संरक्षण, संयुक्त वन व्यवस्थापन, भरगच्च वनीकरण योजना, रस्त्याच्या दुतर्फा वृक्ष लागवड योजना, राष्ट्रीय बांबु मिशन, अटल बांबु समृध्दी योजना इत्यादी वानिकी कार्यक्रम राबविल्यामुळे झालेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उरण (जि.रायगड) येथे शीतगृह तसेच मत्स्य प्रक्रिया केंद्र उभारण्याबाबत

**(१९) * १४९ श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण (जि.रायगड) येथे सागरी मत्स्यव्यवसाय करण्यात येत असून निर्यातीसाठी आवश्यक असलेल्या मत्स्य प्रक्रियेसाठी आणि प्रक्रिया केलेली मासळी टिकविण्यासाठी आवश्यक शीतगृह सुविधा उपलब्ध नसल्याने मच्छीमार बांधवांचे आर्थिक नुकसान होत असल्याची बाब दिनांक १३ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शीतगृह अभावी मासळीचे नुकसान होत असून त्याचा परिणाम निर्यातीवर होत असल्याने मच्छीमार बांधवांनी शासनाकडे मत्स्य प्रक्रिया केंद्र व शीतगृह उभारण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजना किंवा अन्य योजनेंतर्गत उरणमध्ये शीतगृह व मत्स्य प्रक्रिया केंद्र उभारण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नितेश राणे :** (१) होय, अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) करंजा, ता.उरण, जि.रायगड या मत्स्यबंदराचा विकास टप्पा २ च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही सुरु असून त्यामध्ये २०० टन क्षमतेचा बर्फ कारखाना व १०० टन क्षमतेचा फिश स्टोरेज उभारण्याच्या कामांचा समावेश आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शेतकऱ्यांना फळपीक विमा रक्कम संरक्षित रकमेपेक्षा कमी मिळत असल्याबाबत

**(२०) * ८४४ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.शिवाजीराव गर्जे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शेतकऱ्यांच्या फळपिकांचे नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या नुकसानीची भरपाई मिळणेकरीता राबविण्यात येणाऱ्या पंतप्रधान फळपीक विमा योजनेत संत्रा, मोसंबी, केळी, द्राक्ष, पेरु, आंबा, डाळिंब, काजू, पपई, स्ट्रॉबरी आदी फळपिकांना विम्याचे संरक्षण देण्यात येत असून हंगामी पिकांसाठी एक रुपया विमा हप्ता देण्यात आलेला असताना ही सवलत फळपीक विम्याला देण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, फळ पीक विमा संरक्षणासाठी शेतकरी प्रति हेक्टरी तीन हजार ते दहा हजार रुपयांचा विमा हप्ता भरत असूनही नैसर्गिक आपत्तींमुळे फळपिकांचे नुकसान झाल्यास फळपीक विमा धारकांना विमा कंपन्यांकडून संरक्षित रकमेच्या तुलनेत फारच कमी प्रमाणात नुकसान भरपाई मिळत असल्याने त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कृषी विभागाच्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांसांबत संगनमत करुन विमा कंपन्याचा नफा वाढविण्याकरीता करण्यात येणाऱ्या गैरप्रकारास आळा घालण्याकरीता तसेच संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याच्यादृष्टीने शासनामार्फत कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत पुनर्रचित हवामानावर आधारीत फळपीक विमा योजना संत्रा, मोसंबी, काजू, डाळिंब, आंबा, केळी, द्राक्ष प्रायोगिक तत्वावर स्टॉबेरी व पपई या फळपिकांसाठी लागू करण्यात आलेली आहे. सदर योजनेतील अधिसूचित फळपिकांचा विमा संरक्षण कालावधी संपल्यानंतर महावेध प्रकल्पांतर्गत स्वयंचलित हवामान केंद्रावर नोंदविलेली हवामानाची आकडेवारी व योजनेच्या अटी शर्तीनुसार हवामान धोके विचारात घेऊन अधिसूचित फळपिकांची नुकसान भरपाईची परिगणना केली जाते.

पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजना आंबिया बहार सन २०२३-२४ मध्ये २,२२,२३९ शेतकऱ्यांनी १.६३ लाख हेक्टर क्षेत्राकरीता विमा संरक्षण घेतले आहे. सदर विमा संरक्षणापोटी विमा कंपन्यांना एकूण विमा हप्ता रक्कम रुपये ८०२.१३ कोटी प्राप्त आहेत. सहभागी अर्जदारांपैकी पात्र २,०९,०२५ शेतकऱ्यांना रक्कम रुपये ९४३.२२ कोटी इतकी विमा नुकसान भरपाई देय असून एकूण विमा हप्त्याच्या तुलनेत विमा नुकसान भरपाईची वाटपाची टक्केवारी ११८ टक्के आहे. देय नुकसान भरपाई पैकी रक्कम रुपये ९३१.२७ कोटी विमा नुकसान भरपाई विमा कंपनीमार्फत वाटप करण्यात आलेली आहे. उर्वरित नुकसान भरपाई वाटपाची कार्यवाही कंपनीस्तरावर सुरू आहे.

मृग बहार सन २०२४ मध्ये ७३,७९१ शेतकऱ्यांनी ५०,४४६ हेक्टर क्षेत्राकरीता विमा संरक्षण घेतले आहे. सद्य:स्थितीत विमा नुकसान भरपाईची परिगणना कंपनीस्तरावर सुरू आहे.

(३) कृषी विभाग आणि विमा कंपनीच्या तपासणीत काही ठिकाणी फळपीक लागवड नसताना देखील अयोग्य पध्दतीने दाखल केलेले विमा दावे आढळून आले आहेत. विमा संरक्षित क्षेत्रावर फळपीक लागवड नसणे, प्रत्यक्ष लागवड क्षेत्रापेक्षा जास्त क्षेत्राचा विमा घेणे व विहित उत्पादनक्षम वयापेक्षा कमी वय असलेल्या बागांचा विमा घेणे या कारणास्तव आतापर्यंत एकूण १६,६०६ विमा अर्ज रद्द करण्यात आलेले आहेत. सदर अपात्र अर्जदारांवर संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील जिल्हा तक्रार निवारण समितीस कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

तसेच, पीक विमा पोर्टलवरुन सदर अपात्र अर्ज रद्द करुन सदर अर्जांचा शेतकरी हिस्सा जप्त करुन केंद्र शासनाच्या तंत्रज्ञान निधीमध्ये जमा करण्याच्या सूचना संबंधित विमा कंपन्याना देण्यात आलेल्या आहेत. तसेच, राज्यात फळपिकांच्या विमा संरक्षीत क्षेत्राचे जिओ टॅगिंग करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोरेगाव (जि.सातारा) तालुक्यातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या गैरकारभाराबाबत

**(२१) * १४२९ श्री.शशिकांत शिंदे, श्री.एकनाथराव खडसे, श्री.अरुण लाड, श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत कोरेगाव (जि.सातारा) तालुक्यातील नांदवळ, तारगाव, साप, वाठार किरोली, आसनगाव, फडतरवाडी आदी गावांमधील अकुशल मजुरांच्या मजुरीची रक्कम अन्य व्यक्तींच्या खात्यात जमा झाल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील मजुरांचे आधार क्रमांक MIS वर चुकीचे नोंदविण्यात आल्यामुळे याबाबत सातारा जिल्हाधिकारी कार्यालयाने आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना, नागपूर यांच्याकडे माहे ऑगस्ट, २०२४ मध्ये लेखी स्वरूपात कळवून याबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत मार्गदर्शन मागितले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मजूरी अद्यापही मजुरांच्या खात्यात जमा न झाल्यामुळे मजुरांना आर्थिक अडचणीस सामोरे जावे लागत असून मजूरीच्या प्रतिक्षेत असलेल्या अकुशल मजुरांना मागील सहा महिन्यांपासून पंचायत समिती, जिल्हा परिषद आणि जिल्हाधिकारी कार्यालयातील रोजगार हमी कक्षात वारंवार जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सातारा जिल्ह्यातील रोजगार हमी योजनेत सुरु असलेल्या अनागोंदी कारभारास जबाबदार असणाऱ्याविरुध्द कारवाई करुन सदर योजनेतील मजुरांच्या खात्यावर पैसे हस्तांतरित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली केली वा करण्यात येत आहे तसेच सदर योजनेतील मजुरांच्या खात्यावर केव्हापर्यंत पैसे हस्तांतरित करण्यात येणार आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.भरत गोगावले :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

(४) एकूण ७ मजुरांची मजूरी त्यांच्या खात्यावर जमा झालेली नव्हती. त्यांच्या बँक खात्याची माहिती घेऊन ७ पैकी ६ मजुरांची मजूरी त्यांच्या बँक खात्यावर वर्ग करण्यात आलेली आहे. एका मजुराच्या मजूरीची रक्कम त्यांच्या खात्यावर वर्ग करण्याची कार्यवाही सुरू आहे. तांत्रिक स्वरूपाच्या चुकीमुळे सदर बाब झाली असून त्यामध्ये अनियमितता किंवा गैरव्यवहार झालेला नाही.

(५) विलंब झालेला नाही.

-----------------

## कंधाणे गाव (ता.बालगाण, जि.नाशिक) येथील आदिवासी नागरिकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२२) * १३७२ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कंधाणे गाव (ता.बागलाण, जि.नाशिक) पेसा योजनेत समाविष्ट असून येथील आदिवासी नागरिकांना पक्का रस्ता व डांबरीकरणाचा रस्ता उपलब्ध नसल्याने कच्च्या व मातीच्या रस्त्याचा वापर करावा लागत असून, पावसाळ्यात या गावातील रस्त्यांवर सर्वत्र चिखल होत असून गावकऱ्यांची रस्त्याअभावी मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गावात रस्ता नसल्यामुळे गावातील शाळकरी मुलांना व वैद्यकीय सेवेसाठी वयोवृध्द नागरिकांना शहरी भागात जाण्यासाठी पायपीट करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कंधाणे (ता.बागलाण, जि.नाशिक) गावात कच्या रस्त्याऐवजी पक्के रस्ते बांधण्यासाठी व अन्य मूलभूत सुविधांकरीता निधी उपलब्ध करुन देण्यासंदर्भात शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.डॉ. अशोक उईके :** (१) अंशत: खरे आहे.
(२) खरे नाही.
(३) मौजे कंधाणे, ता.बागलाण, जि.नाशिक या गावांतर्गत गारोडी वस्तीपर्यंतच्या रस्त्याच्या काही भागाबाबतची कामपूर्व स्थळपाहणी केली असून सदर कामाचे ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजनेंतर्गत अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

सदर गावात जिल्हा परिषद शाळा इ.१ली ते ४थी पर्यंत आहे. तसेच गावात प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यरत आहे. आदिवासी वस्तीत जल जीवन मिशन योजनेंतर्गत नळ पाणीपुरवठा कार्यान्वित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन स्मार्ट प्रकल्पाला गती देण्याबाबत

**(२३) * १८४९ श्री.सत्यजीत तांबे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात जागतिक बँकेच्या सहकार्याने सन २०२०-२१ पासून बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प सुरू करण्यात आला असून प्रकल्पाचे काम संथगतीने सुरु असल्याची तसेच राज्य शासनाकडून अपेक्षित निधी मिळत नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पाची अंमलबजावणी प्रभावीपणे होत नसल्याबाबत जागतिक बँकेने महाराष्ट्र शासनाकडे पत्राद्वारे नाराजी व्यक्त केली असून प्रकल्पाची फेररचना करण्याची सूचना केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकल्प प्रलंबित रहाण्याची कारणे काय आहेत तसेच सदर स्मार्ट प्रकल्पामध्ये सद्य:स्थितीत किती जिल्ह्यांची व किती गावांची निवड करण्यात आलेली आहे,

(४) असल्यास, सदर प्रकल्पात दिरंगाई होत असल्यामुळे गेल्या सात महिन्यात एकाही नवीन प्रकल्पाला मंजुरी मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, शासनाने कृषी प्रक्रियेकरीता पायाभूत सुविधा उपलब्ध करून, मूल्य साखळी विकसित करून शेतकरी उत्पादक कंपन्यांना बळकटी देण्यासाठी सदर प्रकल्पाची फेररचना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच उपरोक्त प्रकल्पास दिरंगाई करित असलेल्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१) अंशत: खरे आहे.

प्रकल्पाच्या सुरुवातीस प्रथम दोन वर्षामध्ये कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे आर्थिक खर्चावर निर्बंध असल्याने प्रकल्पाची अंमलबजावणी व एकत्रित प्रगतीवर परिणाम झाला आहे. जागतिक बँकेने त्यांच्या दिनांक १०/०९/२०२४ च्या पत्रान्वये तातडीने निधी वितरीत करण्याबाबत सूचना दिल्यानुसार सन २०२४-२५ मध्ये सदर प्रकल्पाकरीता अर्थसंकल्पित केलेला रुपये १६० कोटी इतका संपूर्ण निधी वितरीत केला असून, पुरवणी मागणीद्वारे मंजूर केलेला रुपये १५० कोटी इतका निधी वितरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे. प्रकल्पाच्या सुरुवातीपासून ते आतापर्यंत एकूण रुपये ६४६.५८ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.
(२) जागतिक बँकेने मध्यवर्ती आढावा मिशनच्या दिनांक १४/१२/२०२३ रोजी बैठकीमध्ये ज्या घटकांच्या प्रगतीमध्ये गती आहे व ज्या घटकांची आवश्यकता आहे अशा घटकांच्या एकूण निधी मर्यादेत फेररचना करण्याबाबत शिफारस केली होती.
(३) प्रकल्पाच्या सुरुवातीस प्रथम दोन वर्षामध्ये कोविडमुळे प्रकल्पाच्या एकत्रित प्रगतीवर परिणाम झाला असून उपरोक्त नमूद फेररचनेमुळे प्रकल्प प्रलंबित नाही. स्मार्ट प्रकल्पातील विविध घटकांचा लाभ प्रामुख्याने समुदाय आधारित संस्थांना देय असून आज अखेर राज्यातील ३४ जिल्ह्यात १००७ समुदाय आधारीत संस्थांचे उत्पादक भागीदारी उपप्रकल्प व २९ समुदाय आधारीत संस्थांचे गोदाम तारण पावती आधारीत उपप्रकल्प मंजूर करण्यात आलेले आहेत.
(४) हे खरे नाही. गेल्या ७ महिन्यात २९५ समुदाय आधारीत संस्थांचे उत्पादक भागीदारी तर ५ गोदाम तारण पावती असे ३०० उपप्रकल्प मंजूर करण्यात आलेले आहेत.
(५) जागतिक बँकेने मध्यवर्ती आढावा मिशनच्या बैठकीमध्ये केलेल्या शिफारशीनुसार प्रकल्पांतर्गत समाविष्ट घटकांची प्रगती व आवश्यकता विचारात घेवून, फेररचना करण्यात आली असून, सदर फेररचनेस केंद्र शासन व जागतिक बँकेची मान्यता प्राप्त झालेली आहे. तसेच, प्रकल्पाची अंमलबजावणी प्रभावीपणे होण्याच्या दृष्टीने प्रकल्प संचालक व क्षेत्रिय स्तरावरील विविध अधिकाऱ्यांना दिनांक २२/०१/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये वित्तीय अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## करडी (ता.मोहाडी, जि.भंडारा) परिसरातील पाच गावांमध्ये तलाठ्यांना कामकाजाकरीता इमारत बांधण्याबाबत

**(२४) * २२८ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करडी (ता.मोहाडी, जि.भंडारा) परिसरातील निलज बु., देव्हाडा बु., मोहगाव, खडकी, पांजरा या पाच गावांमधील तलाठी कार्यालयांच्या इमारतींच्या बांधकामासाठी शासनाने एक वर्षापूर्वी निधी मंजूर करूनही बांधकाम सुरू झालेले नसल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इमारतीअभावी सदर गावांतील तलाठ्यांना कार्यालयीन कामकाजासाठी ग्रामपंचायतीचे कार्यालये तसेच सार्वजनिक ठिकाणी असलेल्या मंदिरांमध्ये बसावे लागत असून कामकाजाकरीता आवश्यक असलेल्या सोयीसुविधांच्या अभावामुळे त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मोहाडी तालुक्यातील सदर पाच गावांमध्ये तलाठी कार्यालयांसाठी शासकीय इमारतीचे बांधकाम सुरू करण्याबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली तसेच सदर कामाच्या विलंबास जबाबदार अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२) व (३) भंडारा जिल्ह्यातील मोहाडी तालुक्यामध्ये ३१ तलाठी कार्यालय बांधकामास महसूल व वन विभाग, शासन निर्णय, दिनांक २३/०२/२०२४ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

त्यामध्ये तालुका मोहाडी येथील मौजा करडी परिसरातील निलज बु.,देव्हाडा बु.,मोहगांव, खडकी, पांजरा या पाच तलाठी कार्यालयाचा समावेश आहे. सदर तलाठी कार्यालय इमारत बांधकामाबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग व कंत्राटदार यांच्यामध्ये करारनामा झाला असून बांधकामास सुरुवात करण्यात आलेली आहे.

सद्य:स्थितीत निलज बु., नवनिर्मित साझाचे कार्यालय मंदिरात आहे. देव्हाडा बु., साझा खाजगी इमारतीत असून मोहगांव बु., साझा ग्रामपंचायत इमारतीत आहे. तसेच खडकी व पांजरा हे दोन्ही नवनिर्मित साझे असल्याने तलाठी कार्यालयाच्या इमारतीचे बांधकाम झालेले नसल्यामुळे दोन्ही साझ्याचे कामकाज अतिरिक्त कार्यभार असलेल्या साझ्याच्या तलाठी कार्यालयातून सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हरसुल (ता.त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक) परिसरातील बिबट्याचा बंदोबस्त करण्याबाबत

**(२५) * १३७५ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हरसुल (ता.त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक) परिसरातील तोरंगण गावात व पानगाव (ता.मोहोळ, जि.सोलापूर) परिसरातील अनेक गावांमध्ये बिबट्याचा वावर वाढला असून या बिबट्याने अनेक शेळ्या, कोंबड्यांसह कुत्रे व इतर जनावरांवर केलेल्या हल्ल्यामुळे सदर परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाल्याचे माहे जानेवारी, २०२५ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त गावात तीन पाळ्यात शेती पंपांना वीज पुरवठा होत असल्याने पाणी सोडण्यासाठी शेतकऱ्यांना रात्री अपरात्री शेतात जावे लागत असल्याने तसेच सदर परिसरात बिबट्याचा वावर असल्यामुळे रब्बी हंगामातील पिकांसाठी रात्रपाळी व पहाट पाळीस कोणताही शेतकरी पाणी सोडण्यासाठी शेतात जात नसल्याने पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊन उत्पन्नात घट होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर परिसरातील बिबट्याचा बंदोबस्त करण्याची मागणी स्थानिक नागरिकांकडून होत असतानाही वन विभागामार्फत सदर प्रकरणी दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, हरसुल परिसरातील बिबट्याचा बंदोबस्त करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक :** (१) व (२) मौजे पानगाव, तालुका बार्शी येथे आहे. बार्शी तालुक्यामध्ये माहे जानेवारी, २०२५ मध्ये वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात पशुधनाची हानी झाल्याच्या ०८ घटना व मोहोळ तालुक्यामध्ये ०२ घटना निदर्शनास आल्या आहेत.

पश्चिम भाग, नाशिक वन विभागातील हरसुल वनपरिक्षेत्रात माहे जानेवारी, २०२५ मध्ये वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात १ व्यक्ती जखमी व पशुधन हानीच्या १०८ घटना निदर्शनास आल्या आहेत.
(३) व (४) मानव-वन्यजीव संघर्षावर आळा घालण्यासाठी क्षेत्रिय स्तरावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

- मानवी जिवीतास धोकादायक ठरणाऱ्या वन्यप्राण्यांना वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ मधील तरतूदीनुसार जेरबंद करण्याची कार्यवाही करण्यात येते.
- क्षेत्रिय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या गस्ती पथकांची निर्मिती करून नियमितपणे वनक्षेत्रात तसेच वन्यप्राणी प्रवण क्षेत्रात गस्त घालण्यात येवून वन्यप्राण्यांच्या हालचालींवर नियंत्रण ठेवण्यात येते.
- वन्यप्राण्यांना वनक्षेत्रातच पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे याकरीता कृत्रिम पाणस्थळे, वनतळे, चेकडॅमची निर्मिती करून पाण्याची व्यवस्था करण्यात येते.
- स्थानिक पातळीवर संयुक्त वनव्यवस्थापन समित्या व अशासकीय संस्थांच्या मदतीने स्थानिकांचे प्रबोधन करण्यात येते तसेच सूचना फलक / भित्तीपत्रकाव्दारे नागरीकांनी घ्यावयाच्या दक्षतेबाबत माहिती देण्यात येते.
- आपत्कालीन परिस्थितीकरीता जलद बचाव पथकांची निर्मिती करण्यात आलेली आहे.
- नैसर्गिक भक्ष्य असलेल्या तृणभक्षी वन्यप्राण्यांना वनातच गवत / चारा उपलब्ध होण्याकरीता कुरण विकासाची कामे करण्यात येतात.

- वनालगतच्या गावांतील गावकऱ्यांची वनावरील निर्भरता कमी व्हावी यासाठी डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजना राबविण्यात येत असून त्यात एल.पी.जी. गॅस पुरवठा, बायोगॅस, निर्धुर चुली, सोलर दिवे इत्यादी उपक्रम राबविण्यात येतात.
- हिंस्त्र प्राण्यांचे मानवांवरील हल्ले कमी करण्यासाठी आर्टिफिशल इंटेलिजन्स (AI) आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर काही ठिकाणी केला जात असून भविष्यात मोठ्या प्रमाणात वापर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
- महाराष्ट्र वन्य प्राण्यामुळे झालेली हानी, इजा किंवा नुकसान यांकरीता नुकसान भरपाई प्रदान करणे अधिनियम, २०२३ या कायद्यातील तरतुदीनुसार मृतांच्या कायदेशीर वारसास व नुकसानग्रस्त व्यक्तीस नुकसान भरपाई अदा करण्यात येते.

(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१)(कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.